नि.फौ.ख.क्र.१२६/२०२०
सरकार वि. अतुल
नि.क्र.३८

साक्षीदार क्र **०५** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–रामचंद्र नारायणराव कोल्हे
वय ३३ वर्ष, व्यवसाय–शेती.
राह.मानोरी,तह.उमरेड, जि.नागपुर.

**सरतपासणी सरकारी वकील श्री.व्ही.यु.मिरचे यांच्या मार्फत**

**१.** पोलिसांनी मला पंच म्हणून हजर राहण्यासाठी दि.०३/०७/२०२० पोलिसांनी मला सिर्सी येथे बोलविले होते व मला फक्त सही करा असे म्हटले. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. सहीपुरता **निशानी क्र.३९** देण्यात आला. पोलिसांनी माझे फोटो काढले होते त्यात माझा फोटो आहे त्याला यापुर्वीच **आर्टीकल अ** देण्यात आले. मी आरोपीला ओळखतो. तो आजरोजी न्यायालयात हजर आहे. साक्षीदार न्यायालयात बघुन सांगतो की, आजरोजी आरोपी न्यायालयात हजर नाही.

**सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.**

**२.** हे म्हणणे खरे आहे की, दि.०३/०७/२०२० रोजी बेला पोलिसांनी मला मानोरी गावात बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला मला वाचुन दाखविला व त्यानंतर मी त्यावर सह्या केल्या. मी पंचनामा करतेवेळी विठ्ठल कोल्हे हा हजर होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझा ओळखीचा असल्यामुळे मी त्याला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे ॲड.आर.बी.भोबे यांनी उलटतपास नाकारला.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि १५.०३.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड